**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर**
**नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५**
**मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर**
**दुरध्वनी – ०२५२५ - २५११००**
**E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com**

**प्रेसनोट क्र. १५ दिनांक ०९/०२/२०२६**

# पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२५ बाबत...

महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती २०२४-२५ अंतर्गत पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई पदाच्या १५८ रिक्त पदांच्या व ७ चालक पोलीस शिपाई पदासाठी पोलीस भरती पार पडणार आहे. त्याअनुषंगाने एकूण ९१०९ (पुरुष ७७६३ व महिला १४४६) उमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदरची पोलीस भरती मैदानी चाचणी व लेखी परीक्षा अशा दोन टप्प्यात पार पडणार आहे. सुरुवातीला मैदानी चाचणी दि.११/०२/२०२६ ते दि.२५/०२/२०२६ या कालावधीत पोलीस परेड ग्राउंड, कोळगाव या पोलीस मुख्यालयाच्या मैदानात पार पडणार आहे.

उमेदवारांच्या सोयीसाठी पालघर रेल्वे स्टेशन व बस स्थानक येथे पोलीस भरती हेल्प डेस्क (मदत कक्ष) उभारण्यात आले आहे. तसेच पालघर रेल्वे स्टेशन/पालघर बस स्थानकावर उमेदवारांसाठी असलेल्या सुचनांचे फलक लावण्यात आलेले आहेत. पालघर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस भरतीकरीता लांबून येणाऱ्या उमेदवारांसाठी निवासस्थानाची व्यवस्था आली असून **१) आंबामाता मंदिर, पाचबत्ती नाका, पालघर (महिला उमेदवारांसाठी) २) उमरोळी ग्रामपंचयत हॉल, उमरोळी ३) पद्मनाभ स्वामी मंदिर, टेंभोडे (पुरुष उमेदवारांसाठी) या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.**

उमेदवारांनी मैदानी चाचणीकरीता उपस्थित राहताना कोणत्याही प्रकारची डिजीटल स्मार्ट वॉच अथवा इतर तांत्रीक साहित्याचा वापर करता येणार नाही. मैदानामध्ये स्पाईक शुजचा वापर करता येणार नाही. डमी उमेदवार, उत्तेजक द्रव्य घेणे यासारखे गैर प्रकार केल्याचे आढळून आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

सदरची पोलीस भरती प्रक्रिया निपक्षपातीपणे पार पडणार असून कोणत्याही गैरप्रकाराला यामध्ये थारा असणार नाही. कोणत्याही व्यक्तीकडून ओळखीचे, आमिष दाखवून, पैशाची मागणी करीत असल्यास किंवा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय आल्यास तात्काळ **पोलीस नियंत्रण कक्ष, पालघर दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२०५३००/२०५३१४ तसेच पोलीस हेल्पलाईन क्रमांक ८६६९६०४००४/८६६९६०४०७० या मोबाईल क्रमांकावर अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग संपर्क क्रमांक ०२५२५-२९७२९७ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.**

भरती प्रक्रियेकरीता येणाऱ्या सर्व उमेदवारांना पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन हार्दिक शुभेच्छा !